# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

५४) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०४.०९.२०२५

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (२८/०८/२०२५ ते ०३/०९/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०५/०९/२०२५ ते ०९/०९/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ | ०३ | दिनांक | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ३० | २५ | १३ | ५ | २ |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | २६ | २७ | २६ | २९ | ३० |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | २२ | २२ | २२ | २२ | २१ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ७ | ५ | ४ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९१ | ९१ | ९१ | ९० | ९० |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८१ | ७८ | ८१ | ७२ | ६४ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १९ | १४ | ११ | १० | ६ |

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. **दि. ५ व ६ सप्टेंबर रोजी काही ठिकाणी मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे आणि इतर दिवस हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| चेतावणी | | **दि. ५ ते ६ सप्टेंबर रोजी घाट भागात विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वाऱ्यासह जोराचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | **दि. ५ व ६ सप्टेंबर रोजी काही ठिकाणी मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| मूग, उडीद | काढणी | पावसाची शक्यता असल्याने, पक्व झालेली पिके (काढणीला आलेली पिके) त्वरीत काढणी करून सुरक्षीत ठिकाणी ठेवावीत किंवा प्लास्टिकच्या कागदाने झाकून ठेवावीत. |
| मूग, उडीद | साठवणूक | शेंगा खळयावर चांगल्या वाळल्यावर काठीच्या सहाय्याने झोडपून दाणे अलग करावेत. साठवण कोंदट किंवा ओलसर जागेत करू नये. शक्य झाल्यास धान्यास १ टक्का करंज किंवा एरंडीचे तेल चोळावे किंवा कडुनिंबाचा पाला (५ टक्के) धान्यात मिसळून धान्य साठवावे. यामुळे धान्य साठवणुकीतील किडींपासून संरक्षण होते. |
| कापूस | फुले उमलणे ते बोंड धरणे | भारी जमिनीत विशेषतः रासायनिक खते मिळाल्यास बागायती क्षेत्रातील संकरित वाणाची कायिक वाढ जास्त होते. तसेच बोडाच्या वजनामुळे फाद्या मोडण्याची शक्यता असते. त्यामुळे ८० ते ९० दिवसाचे पीक झाल्यावर मुख्य फांदीचा शेंडा खुडावा यामुळे पिकाची कायिक वाढ मर्यादित होते. |
| तुर | फांद्या फुटण्याची अवस्था | तुर पिकामध्ये वाझ रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावी. |
| सोयाबीन | शेंगा सुटण्याची अवस्था | ढगाळ वातावरणामुळे पिकांमध्ये पाने खाणाऱ्या अळीचा (स्पोडोप्टेरा) प्रादुर्भाव आढळून येतो. त्याच्या नियंत्रणाकरिता फ्लूबेंडामाईड २० % डब्लू.जी. ६ ग्रॅम अथवा फ्लूबेंडामाईड ३९.३५% एसी ३ मिली अथवा इंडोक्झाकार्ब १५.८० % ई.सी. ६ मिली अथवा स्पिनेटोरम ११.७० % एस.सी. १० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. **(पाऊसाचा अंदाज/ उघडीप पाहूनच फावरणी करावी.)** |
| मका | कणसे सुटताना | मागील काही दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे लष्करी अळीचा प्रादुर्भाव आढळून येत आहे, त्याकरीता खालीलप्रमाणे फवारणी करावी.<br>१) अळीच्या वाढीच्या लवकरच्या (१ ते ३ अवस्था) अवस्थांमध्ये निमअर्क १५०० पीपीएम ५ मिली किंवा निंबोळी अर्क ५% यांची प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. अथवा<br>२) क्लोरँट्रनिलीप्रोल १८.५% एस सी ४० जी.ए.आय./ हेक्टर किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५% एस जी ८ ग्रॅम प्रति लि. या प्रमाणात फवारणी करावी. अथवा<br>३) स्पिनेटोरम ११.७ एस. सी. या कीटकनाशकाची ०.५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. अथवा<br>४) इमामेक्टीन ५% + बेन्झोएट ल्युफेनुरॉन ४०% डब्लू.जी.०.२ ग्रॅम किंवा नोव्हालुरॉन ५.२५% + |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| | | इमामेक्टीन बेंझोएट ०.९% एस सी ३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. **(पाऊसाचा अंदाज/ उघडीप पाहूनच फावरणी करावी.)** |
| **कांदा** | **लागवड** | रांगडा कांदा लागवडीसाठी बसवंत ७८०, फुले समर्थ, एन-२-४-१ इत्यादी सुधारीत वाणांची निवड करावी.<br>लागवडीची वेळ: सप्टेंबर - ऑक्टोबर.<br>बियाण्याचे प्रमाण: ८ ते १० किलो/ हेक्टर |
| **भाजीपाला** | **उगवण** | भाजीपाला पिकांमध्ये लागवडीनंतर रसशोषक किडीच्या जैविक नियंत्रणाकरीता पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पिके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा. रसशोषक किडीचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून आल्यास रासायिनक कीडनाशके आणि बुरशीनाशकाचा वापर करावा. |
| **पशुसंवर्धन** | | पावसाची शक्यता असल्याने जनावरांना सुरक्षित ठिकाणी बांधावेत. जनावराना उघड्यावर चरावयास सोडू नये, तसेच त्याच्याकडे बारकाईने लक्ष द्यावे. |
| **कुक्कुटपालन** | | पावसाची शक्यता असल्याने पोल्ट्री पक्षीना पक्क्या शेडमध्ये सुरक्षित ठिकाणी ठेवावेत. |

**स्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : ०४.०९.२०२५

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**